सा विद्या या विमुक्तये

प्रगती मंडळ, साईहिल संचालित

**प्रगती विद्या मंदीर**

नरदास नगर, भांडुप, मुंबई

वर्ष -३ अंक-२ ▌ जुलै -२०२० (गुरुपौर्णिमा)

# प्रगतीपर्व

## हितगुज....

“प्रगती पर्व” चे तृतीय वर्षातील हे पुष्प गुंफण्याच्या निमित्ते हे हितगुज कृतज्ञता व्यक्त करण्याची मुख्याध्यापिका या नात्याने लाभलेली ही मौलिक संधी.

मराठी शाळांच्या अतीव दु:खदायक -हासाच्या पार्श्वभूमीवर आपल्या सर्व वैयक्तिक अडचणी, स्वार्थमूलक कल्पनांना तिलांजली देऊन, केवळ विद्यार्थ्यांच्या सर्वथेव, सर्वांगीण विकासासाठी अहोरात्र झटलेल्या माझ्या सर्व सहका-यांचे कौतुक करण्याचे टाळणे हे त्यांच्या अनमोल योगदानाप्रती घोर कृतघ्नताच ठरेल.

इच्छा असेल तिथे मार्ग दिसेल, या उक्तीनुसार आपल्या मराठी शाळेचे पर्यायाने अतिशय संपन्न अशा मराठी मायमाऊलीचे पुनरुत्थान करण्याच्या हेतूने हा ज्ञानयज्ञ टिकून रहावा या एकमेव प्रामाणिक उद्देशाने आपण सर्व सहका-यांच्या मदतीने नवनवीन संकल्पना राबवित आहोत. प्रगतीपर्व चे प्रकाशन हे त्यापैकींच एक. छापील आवृत्ती वितरणामागील अडथळ्यावर मात करत आज या जागतिक महामारीच्या लॉकडाउनच्या अराजक परिस्थितीतही आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन हे पुष्प आपल्या स्वाधीन करताना अतिशय सार्थ अभिमान व आनंद होत आहे.

श्रीम. निलिमा महाजन
मुख्याध्यापिका



## नैमित्तिक — गुरुपौर्णिमा

गुरुपौर्णिमा भारतातील एक महत्वाचा सण आहे. आषाढ महिन्यातील शुद्ध पौर्णिमेला गुरुपौर्णिमा साजरी केली जाते. भारतीय संस्कृतीत गुरुला देवाप्रमाणे मानले जाते म्हणूनच या दिवशी गुरुपूजन केले जाते. शाळा, कॉलेज आणि सांप्रदायामध्ये गुरुपौर्णिमा मोठ्या उत्साहाने साजरी केली जाते.

गुरुपौर्णिमेला व्यासपौर्णिमा असेही म्हणतात. महर्षी व्यासांनी वेदांचे ज्ञान जगासमोर मांडले. व्यासांना भारतीय संस्कृतीमध्ये आद्यगुरु समजले जाते. महाभारतातून व्यासांनी धर्मशास्त्र, नितीशास्त्र, मानसशास्त्र आणि व्यवहारशास्त्राचे विविध पैलू मांडले गेले.

आपल्या गुरुंविषयी कृतज्ञता व्यक्त केली जाते गुरुची महती थोर असते म्हणून लहानपणापासून आपल्याला “आचार्य देवो भव:” ही शिकवण दिली जाते. गुरु अथवा शिक्षक हा देवाप्रमाणे असतो या शिकवणीमुळे भारतात गुरुपौर्णिमा श्रद्धापूर्वक साजरी केली जाते.

**श्रीम. निलिमा महाजन**

## जगभर हिंडताना...

# पंढरपूरचे- विठ्ठल मंदिर

शके ११११ मधील शिलालेखाच्या आधारे असे अनुमान करता येते की शके ११११ मध्ये पंढरपुरातील विठ्ठलाचे देऊळ निर्माण झाले. स्थापनेच्यावेळी मंदिर अगदी लहान होते. हा "लानमडू" हळूहळू वाढत गेला, शके ११५९ मध्ये त्यास होयसळ यादवांपैकी वीर सोमेश्वर याने कर्नाटकातील एक गाव दान दिला. शके ११९५ मध्ये श्रीरामचंद्र देवराज यादव व त्याचा करणाधिप हेमाद्री पंडित याने पुढाकार घेऊन या देवळाची वाढ केली आणि देवस्थानाची त्याच्या किर्तीस साजेसी व्यवस्था लावून दिली. देवळाचा विस्तार शके १९२५च्या सुमारास पुष्कळच झाला. विठ्ठलाला द्वैती भक्तांनी सोवळ्याच्या पालखीतून कर्नाटकात गेले. पण अद्वैती वारकरी मंडळीयांनी एकनाथांचे आजोबा भानुदास यांनी तो देव परत पंढरपूरात आणला अशीही कथा सांगितली जाते. मराठी भक्तांइतकेच कानडी भक्त, तसेच इतर जातिधर्मांचे लोकही विठ्ठलाला भेटायला येतात. कर्नाटकाचे पक्वान पुरणपोळीच विठ्ठलाच्या नैवेद्याला त्याला आवडते म्हणून दाखविली जाते. पंढरपूरची वारी ही सर्वात लोकप्रिय आहे.

पंढरपूर ही भारताच्या महाराष्ट्र राज्यातील सोलापूर जिल्ह्याचा एक तालुका आहे. पंढरपूर हे गाव भीमा (चंद्रभागा) नदीच्या काठावर वसले आहे. पंढरपुराला पंढरी असेही म्हणतात. पंढरपूर या क्षेत्राचे प्राचीन कन्नड नाव पंडरगे असे आहे. पंढरपूरातील विठ्ठल मंदिरामुळे वारक-यांचे तीर्थक्षेत्र म्हणून प्रख्यात आहे. दरवर्षी आषाढी एकादशीच्या सुमारास अनेक भाविक वारी करण्यासाठी व विठ्ठल-रखुमाईच्या दर्शनासाठी पायी चालत येतात.

**श्रीमती. ज्योत्स्ना चौधरी**

## व्यक्तिपरिचय-



(जन्म-२८ मे १९२७
मृत्यू-१५ जून २०२०)

### प्रयोगशील शिक्षणतज्ञ लीलाताई पाटील

एरवादा शिक्षक किती शिस्तबद्ध, किती तर्ककठोर तरीही मुलातले बाल्य न हरवू देता त्यांना घडवण्यासाठी कमालीचा संवेदनशील असू शकतो याचे उदाहरण म्हणजे लीलाताई. त्यांचे बालशिक्षणातले प्रयोग अधिक मोलाचे- स्वयंसिद्ध शिक्षक, प्रशासक, शिक्षणविषयक मुलभूत चिंतक म्हणून लीलाताईंनी केलेले काम समाजासाठी मार्गदर्शक ठरले जे करायचे ते नियोजनबद्धपणे, बोलायचे ते ठामपणे हा त्यांचा बाणा होता.

आंतरभारतीच्या सहाय्याने शिक्षणास सर्जनात्मक व आनंददायी बनवण्यासाठी "सृजन आनंद विद्यालय" नावाची इयत्ता १ली ते ४थी पर्यंतचे शिक्षण (केवळ औपचारिक नव्हे) देणारी एक शाळा त्यांनी सुरु केली. लीलाताईंची पुस्तके ही शिक्षक माणूस घडवणारे उत्तम माध्यम आहे. विशेषत: मराठी अध्यापन हा लीलाताईंचा जीव की प्राण होता त्यात त्यांनी अनेक प्रयोग करुन पाहिले. "सृआवि" त अशा प्रयोगांना लिखित रुप देण्यात आले आहे.

**श्रीमती. ज्योत्स्ना चौधरी**

# मानवी जीवनात कलेचे महत्व



भारतात पुरातन काळात कलेला मोठे मानाचे स्थान होते. धर्मग्रंथात असा उल्लेख आढळतो की, १४ विद्या व ६४ कला शिक्षणक्रमात सामाविष्ट होत्या. गुरुकुलातून बाहेर पडणारे विद्यार्थी ६४ कलांचे संस्कार घेऊनच बाहेर पडत असे. वात्सायन ऋषी यांनी ग्रंथात प्रत्येक घरात चित्रकलेले साहित्य असावे असे आग्रहाने सांगितले आहे. तर आर्य चाणक्यांनी आपल्या अर्थशास्त्रात चित्रकलेचा मोठ्या आदराने उल्लेख केला आहे.

जन्माला येणा-या प्रत्येक मानवात सुप्त कलागुण दडलेला असतो. सुप्त कलागुणांना ओळखणे ही सुद्धा एक कलाच आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण व आरोग्य हया मानवाच्या मुलभूत गरजा आहेत. शिक्षणाने मानवाचे व्यक्तिमत्व उजळते, तर कलेच्या स्पर्शाने समृद्ध बनते.

नृत्य, नाट्य, संगीत, चित्र व शिल्प अशा अनेक कलांपैकी एवाद्या जरी कलेची गोडी लहान वयात लागली तर आयुष्य अधिकच आनंदी होईल. कला ही अदभुत आहे. दिव्य आहे शाश्वत आहे म्हणून भावना, संवेदनशीलता कलेत साकारली जाते.

मानवाने कलेद्वारे सांस्कृतिक प्रगती केली आहे. संस्कृतीमुळे कलेची निर्मिती झाली व कलेमुळेच संस्कृती टिकून राहिली. कलेतून नवनिर्मिती करणे मानवाला मिळालेले वरदान आहे. अशा नैसर्गिक कलागुणांना आपण प्रोत्साहन दिलेच पाहिजे.

अनेक शिक्षणतज्ञ व विचारवंतांच्या मते शिक्षणात कलेचे फार महत्व आहे, म्हणूनच शासनाने प्रचलित शिक्षणावर भर दिला आहे. सृजनात्मक अभ्यासामुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास शक्य आहे. त्यामुळेच पालक आपल्या मुला-मुलींना नृत्य, नाट्य, संगीत व चित्रकला या विषयांतर्गत शासकीय परीक्षा देण्यास प्रोत्साहन देत आहेत.

श्री. प्रकाश कारंडे - कलाशिक्षक

---

## मजेदार कोडे -

अ) सोमवार, मंगळवार, बुधवार, गुरुवार, शुक्रवार, शनिवार किंवा रविवार हे शब्द न वापरता आपण सलग ३ दिवसांची नावे सांगू शकता का?

ब) प्रत्येकाकडे मी आहे आणि माझ्याशिवाय तुम्ही लांब जाऊ शकत नाही.. ओळखा पाहू मी कोण?

**क) मराठी प्रेमिकांनो प्रचलित म्हणी पूर्ण करा!!**

१. पु पा मा स  २. झा मु स ला  ३. मा म मा ज

........................................................................................................

उत्तरे : अ) काल, आज आणि उद्या  ब) सावली

क) १. पुढचं पाठ मागचं सपाट  २. झाकली मुठ सव्वा लाखाची

३. माय मरो मावशी जगो

## बोधकथा

हिंदू धर्मशास्त्रामध्ये अष्टावक्र नावाचे एक विचारवंत होऊन गेले. असे म्हणतात की अष्टावक्र हे केवळ कुरुपच नव्हते तर त्यांचे शरीरही बेढब होते. त्यांचे शरीर ८ ठिकाणी वाकडे होते म्हणून त्यांना अष्टावक्र म्हटले जात होते. ही एक प्रसिद्ध कथा आहे. अष्टावक्र ऋषी एकदा राजा जनक यांच्या दरबारात गेले. दोन्ही बाजूंनी उंच आसनावर सभासद, ज्ञानी, पंडित, ज्ञानकर्मी बसले आणि राजा जनकाचे सिंहासन होते. अष्टावक्र ऋषींना द्वारपालाने रोखले नाही. अष्टावक्र त्यावेळी किशोरवयीन होते. अष्टावक्राने जेव्हा राजा जनकाच्या मुख्य सभामंडपात प्रवेश केला तेव्हा त्यांच्यावर नजर पडताच सर्वजण एकमेकांकडे पाहून हसू लागले होते. इतकेच नाही तर त्यांचे हसू थांबत नव्हते. हे पाहून अष्टवक्राला प्रथम काहीच समजले नाही, मात्र त्यानंतर त्याला सर्वजण आपल्यावर हसतात म्हणून लक्षात आले हे पाहून तो ही जोरजोरात हसू लागला. जनक राजाने सभेला शांत होण्याचे आवाहन केले. सभा शांत होताच राजा जनकाने अष्टावक्राला विचारले, "हे साधू हे लोक तुमच्यावर हसतात हे माझ्या लक्षात आले पण तुम्ही का हसता आहात ते समजले नाही ?" अष्टावक्राने उत्तर दिले, "महाराज मला वाटले राजा जनक जो ज्ञानी, विचारवंत आहे त्याच्या सभेत ज्ञानी, विचारवंत, हुशार लोक असतील पण इथे तर सर्वच जण कातडीकडे व बाह्य स्वरुपाकडे पाहणारे लोक आहेत. माझ्या रुपाकडे पाहून हे लोक मला हसत होते हे पाहून मला यांच्या बुद्धीची कीव आली व हसू फुटले" जनक राजासह सर्व सभा अष्टावक्र ऋषींच्या या उत्तराने शरमिंदी झाली.

**तात्पर्य :** माणसाचे महत्व त्याच्या शरीरावर नाही तर त्याचे ज्ञान, परिश्रम आणि कर्मावर आहे.

**श्रीमती. ज्योत्स्ना चौधरी**

---

### शिवकालीन खडक फोडण्याची पद्धत :



गडावर एका रेषेत छिद्रे पाडून त्या छिद्रांमध्ये सुके सागवानी लाकडे (खुंटी) घुसविली जायची. त्या लाकडाला वरुन पाणी दिले जायचे. एक आठवड्यात लाकूड फुगून खडक फुटतो आणि आपल्याला पाहिजे त्या आकारात खड्डा मिळतो.
यातील बाहेर काढलेले दगड सुद्धा तुकडे न होता चांगल्या स्थितीत आणि आकारात मिळतात.
गडकिल्ल्यांवर आपल्याला पाण्याची टाकी आयताकृती चौकोनी कोरलेल्या दिसतात आणि बुरुजाचे दगड चौकोनीच दिसतात ते या तंत्रज्ञानामुळे (त्या काळात दगड फोडण्यासाठी दारुगोळा उपलब्ध होता. तरी शिवछत्रपती पर्यावरण पुरक मार्ग वापरायचे. ही पद्धत वापरली नसती तर बुरुज बांधायला लागणारे चिरे खालून वर चढवावे लागले असते. त्याऐवजी कमी वेळेत कमी साहित्यानिशी, कमी पैसा मनुष्यबळ वापरुन महाराजांनी जास्त गडदुर्ग बांधले)

**संदर्भ :** शिवाजी द ग्रेट इंजिनीअर

**श्रीमती. रश्मी सावंत**